दैनिक मराठवाडा पत्र



# मनपा, न.प.प्रमाणेच जिल्हा परिषद पंचायत समितीतही स्वीकृत सदस्यांची एंट्री होणार!

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील जि.प प.स निवडणुका होताच महापालिका आणि नगरपालिकांमध्ये स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्यात आली. याप्रमाणेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य निवडण्यात येणार असल्याचा निर्णय घेतला आहे.राज्य मंत्रिमंडळात हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के सदस्य निवडता येतील. मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार किमान ५ सदस्य निवडणे बंधनकारक असणार आहे. यासंदर्भात लवकरच विधिमंडळात कायदा पारीत केला जाणार आहे.

जि.प आणि पंचायत समिती निवडणुकांतर्गत जिल्हा परिषदेत ५ आणि पंचायत समितीमध्ये २ सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करण्यात यावी, अशी मागणी



महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली होती.मुख्यमंत्र्यांनी या विषयावर सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामविकास विभागाला कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार राज्य मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत हा निर्णय घेण्यात आलाय. ग्रामीण भागात समाजाभिमुख कार्य करणाऱ्या, परंतु निवडणूक लढविण्याची क्षमता नसलेल्या पात्र कार्यकर्त्यांना विकास प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध होईल,या उद्देशाने महायुती सरकारने हा निर्णय घेतला आहे. दरम्यान राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलंडलेल्या स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका घेण्यास सुप्रीम कोर्टानं मनाई केली आहे. राज्यात आता २२ जिल्हा परिषदा आणि त्यांअतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. या सुनावणीत न्यायालयानं उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास मनाई केली आहे.

## थोडक्यात...

### महिलांच्या एकोप्यानेच गावांचा शाश्वत विकास शक्य – संजय परमार

**पठाण मांडवा येथे फलोत्पादक शेतकऱ्यांना ग्लोबल विकास ट्रस्टकडून ठिबक संचांचे मोफत वितरण**



**परळी वै । प्रतिनिधी**

राज्य व देशाच्या प्रगतीत महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून आज त्या प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसत आहेत. उद्योग, व्यापार, नोकरी यांसोबतच आता कृषी क्षेत्रातही महिलांनी सक्रिय सहभाग घेत यशोगाथा निर्माण करण्यास सुरुवात केली आहे. गावांच्या शाश्वत विकासासाठी महिलांनी एकोपा निर्माण करून गटांची स्थापना करावी आणि गटशेतीच्या माध्यमातून आर्थिक उन्नती साधावी, असे प्रतिपादन ग्लोबल विकास ट्रस्टचे ट्रस्टी संजय परमार यांनी केले. ते अंबाजोगाई तालुक्यातील पठाण मांडवा येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. या कार्यक्रमात फलोत्पादक शेतकऱ्यांना ग्लोबल विकास ट्रस्ट व रोटरी क्लब ऑफ दिल्ली प्रीमियरच्या वतीने मोफत ठिबक सिंचन संचांचे वितरण करण्यात आले. ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. पठाण मांडवा येथे ३५ पेक्षा अधिक शेतकरी नव्याने केळी लागवडीकडे वळले असून त्यांना मोफत मार्गदर्शनासोबतच आवश्यक तांत्रिक व आर्थिक सहाय्य दिले जात आहे. शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठीच ठिबक सिंचन साहित्याचे वितरण करण्यात आले. याशिवाय मोतीलाल ओसवाल यांच्या सहकार्याने –ण डारश्रश्र ऋळपरपलश इरपज्ञ मार्फत इच्छुक शेतकऱ्यांना कर्जाच्या स्वरूपात आर्थिक मदतही उपलब्ध करून दिली जात आहे.

### नांदा सौख्य भरे ज्ञानेश्वर आणि रोहिणी यांचा शुभविवाह



**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील सोन्नाखोटा येथील रहिवासी श्री. डीगांबर नारायणराव लांडे यांचे सुपुत्र चि. ज्ञानेश्वर आणि कवडगाव येथील श्री. रमेश माधवराव लोंढे यांची सुकन्या चि.सौ.कां. रोहिणी यांचा शुभविवाह परवा गुरुवार दि. २६ फेब्रुवारी रोजी दुपारी २.४५ वाजता कवडगाव, येथे शानदार सोहळ्यात थाटामाटात संपन्न झाला. नवविवाहित जोडप्याला शुभाशीर्वाद देण्यासाठी शहरातील उद्योग, व्यापार, शिक्षक, डॉक्टर, पत्रकार,राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच मीडिया व क्षेत्रातील अनेक प्रतिष्ठि मान्यवर उपस्थित होते. लांडे पाटील व लोंढे पाटील यांच्या शुभ विवाह सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रमुख पाहुण्यांनी नवदांपत्यास वैवाहिक जीवनासाठी सुख, समृद्धी, आरोग्य व अखंड सौख्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या. त्यांच्या पुढील भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या सोहळ्याचे निवेदक म्हणून खेत्री सर यांनी लांडे व लोंढे परिवारांच्या वतीने येणाऱ्या पाहुण्याचे शब्द समूहाने स्वागत केले. लग्न सोहळा योग्य रित्या पार पाडण्यासाठी कवडगाव व सोन्नाखोटा व मित्र परिवारांचे सहकार्य लाभले.

### आनंदी जीवनासाठी ज्ञानेश्वरीशी समरस व्हा – ह.भ.प. माधव महाराज डाके




**बीड । प्रतिनिधी**

मी, मला आणि माझे ही अहंकाराची व्यंकटी दूर झाली पाहिजे. जीवन जगताना काम, क्रोध, लोभ, मत्सर यांसारखे दुर्गुण सोडून आत्मपरीक्षणाची सवय लावली, तरच जीवन आनंदी व समाधानी होते आणि ही समाधानाची दृष्टी आपल्याला गाथा आणि ज्ञानेश्वरी देते, असे प्रतिपादन ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक तथा ज्ञानेश्वरी भाव कथा प्रवक्ते ह.भ.प. माधव महाराज डाके यांनी घरोघरी ज्ञानेश्वरी भेट कार्यक्रमा प्रसंगी बोलताना केल. 'ज्ञानेश्वरी व तुकाराम गाथा ग्रंथ स्नेहभेट' या आध्यात्मिक कार्यक्रमात त्यांनी दिनांक २३/२/२०२६ रोजी छत्रपती कॉलनी, पांगरी रोड उबाळे निवास येथे प्रवचनात वरील अनमोल विचार व्यक्त केले. माऊली श्री ज्ञानोबाराय यांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित तसेच जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या त्रिशत्कोत्तर बीज उत्सवानिमित्त, ह भ प माधव महाराज डाके बीड व ह भ प हरिदासजी सोळुंके गुरुजी यांच्या संयोजनाने 'ज्ञानदेव–तुकाराम आपल्या घरी' या उपक्रमांतर्गत घरपोच ग्रंथ स्नेहभेट सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. बीड शहरातील पांगरी रोड परिसरातील छत्रपती संभाजी नगर मधील सेवानिवृत्त सैनिक योगगुरु श्री सिताराम महाराज उबाळे यांच्या निवासस्थानी परवा आयोजित सोहळ्यात तब्बल वीस (२०) साधकांना यावेळी गाथा व ज्ञानेश्वरी ग्रंथाचे वाटप करण्यात आले.

## NMMS परीक्षेच्या निकालात खांडवे कोचिंग क्लासेसचा डंका

### २५ पैकी २० विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र, सत्कार समारंभ उत्साहात

**वडवणी । प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये घेण्यात आलेल्या एन. एम. एम. एस. परीक्षा मध्ये वडवणी येथील खांडवे कोचिंग क्लासेसने यशाची परंपरा कायम राखत २५ पैकी २० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये १) प्रथम यादव भक्ती – १२४ गुण दुतीय २) चोरमले ऋतुजा – १२२ गुण तृतीय ३) जाधव समृद्धी– १२१ बडे साक्षी – १०५, मदने देवयानी – १०२,घुगे निकिता – १०१,इंगोले सत्यम – ९५, धायतिडक जान्हवी – ९४, गोंडे भक्ती – ८८, कदम शिवानी – ८८, नरवडे अनुजा – ८८, चव्हाण अभिजीत – ८८, इंगोले




शिवम – ८६, लोंढे अक्षरा– ८५, वरकड सामोरी– ८४,बगाडे सार्थक– ८२, जाधव अनन्या – ८१, मुळे भक्ती – ८०, मात्रे श्रावणी–७८, गुण चौरे अविनाश – ७८ गुण मिळवलेले आहेत. या उल्लेखनीय यशाबद्दल खांडवे कोचिंग क्लासेस यांच्या वतीने छचचड परीक्षेत यश संपादन करून क्लासचे नाव उज्ज्वल करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या भव्य सत्कार समारंभ खांडवे कोचिंग क्लासेस संचालक सौरभ खांडवे सर यांनी दि.२७/०२/२०२६ शुक्रवार रोजी आयोजित केला होता. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना वही पेन कंपास व शाल, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा तसेच त्यांच्या पालकांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवसेनेचे तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे तर प्रमुख पाहुणे म्हणून अँड. विठ्ठल बादाडे पाटील स्टेनोग्राफर वन विभाग, नागपुर, सरपंच संजय धपाटे, माजी नगरसेवक दत्तात्रय जमाले, पत्रकार संभाजी लांडे, अजय खांडवे,बाळासाहेब महाराज दुटाळ रेणुका माता संस्थान वडवणी, राधाकिसन सुरवासे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक खांडवे सर यांनी केले, तर सूत्रसंचालन युवराज मामा शिंदे यांनी केले. या कार्यक्रमाला विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आदित्य शिक्षण संस्था, बीड येथे 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहात साजरा



**बीड । प्रतिनिधी**

भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृतीची ओळख, इतिहासाची साक्ष, संस्कारांची परंपरा आहे. आपण इंग्रजी, हिंदी किंवा इतर भाषा नक्की शिकलो पाहिजे. मात्र आपल्या मराठी भाषेचा सन्मान आणि वापर कधीही कमी होता कामा नये. मराठवाडा ही संतांची भूमी आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा आणि संत गाडगेबाबा यांनी मराठी भाषेतून समाजप्रबोधन केले. ही परंपरा जपणे हीच खरी मराठीची सेवा आहे, असे प्रतिपादन शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव येथील अधिव्याख्याता प्रा. विकास ढोकणे यांनी केले. ते आदित्य शिक्षण संस्था, बीड येथे आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

आदित्य शिक्षण संस्था, बीड येथे मराठी भाषा गौरव दिन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा आणि संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जय मराठी, जय महाराष्ट्रच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला होता. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## जि. प. शाळा काठोडा येथे 'मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थे'च्या वतीने मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते, थोर साहित्यिक कवी वि. वा. शिरवाडकर तथा 'कुसुमाग्रज' यांच्या जयंतीनिमित्त आज (२७ फेब्रुवारी२०२६)जिल्हा परिषद शाळा,काठोडा येथे 'मराठी भाषा गौरव दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या शानदार कार्यक्रमाचे आयोजन बीड येथील 'मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था' आणि जि. प. शाळा काठोडा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात कवी कुसुमाग्रज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून तसेच दीपप्रज्वलनाने झाली.यावेळी बोलताना मान्यवरांनी कुसुमाग्रजांचे मराठी




साहित्यातील अनमोल योगदान आणि मातृभाषेचे आपल्या जीवनातील महत्त्व यावर सविस्तर प्रकाश टाकला. मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती आपली संस्कृती आणि अस्मिता आहे. तिचे संवर्धन करणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे, असा मोलाचा संदेश संस्थेच्या प्रतिनिधींनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. यावेळी उपस्थित संस्थेचे तेजस पवार,रोहन डोळस, तेजस्विनी पवार,शिक्षक व विद्यार्थी होते.

## डी.के.नागवे सरांच्या अकॅडमीचे NMMS परिक्षेत उत्तुंग भरारी: ५१ पैकी ४४ विद्यार्थी उत्तीर्ण

**वडवणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात ८ वी छचचड परिक्षेत, डी.के.नागवे सरांच्या अकॅडमीचे ५१ पैकी ४४ विद्यार्थी उत्तीर्ण, तर माने आर्यन गणेश १७९पैकी १५४ विक्रमी गुण घेऊन (प्रथम),मुंडे सुदर्शन रावसाहेब १७९ पैकी १४३ गुण घेऊन (द्वीतीय),यादव शिवम गंगाराम १३५ (तृतीय) त्याचबरोबर,कुरकुटे वैष्णवी रामदास–१३४,शिंदे अक्षद विशालराव–१२६,राठोड सूरज अंकुश–१२३, कीर्तने सोनाली कल्याण–११९,उजगरे साक्षी राजेश–११६, वैष्णवी पेशवे दिलीप–११६,डांबे मैथिली अशोक–११५,अंकुशे अथर्व अनंत–११५, तिडके पंकजा बालाजी–१११, मोराळे पूजा संतोष–११०, घुमरे अक्षरा अरुण–१०९,मस्के गायत्री गोरख–१०४, तांबडे वेदांत ईश्वर–१०४,मस्के




रविराज शंभू–१०४,टिकुळे सीता गणेश–१०१,लोकरे भक्ती देवीदास–१००,गोंडे अरव अंकुश –१००,आंधळे अमर विठ्ठल–९९,शेळके अनंत कोंडीराम–९९,पेशवे आनंद दिलीप–९८,लांडे स्वराज रामप्रभू–९७, मुंडे शैलेश संजय–९६,मस्के किशोरी महामुद्रा–९५,सार्थक चौरे राहुल–९४,लांडे आर्यन कैलास–९२,राठोड पृथ्वीराज शिवाजी–९२,उजगरे श्वेता शत्रुघ्न–९१,केदार शिवम कचरू–९०,लांडे स्वरूपा परमेश्वर–८७,माने सुमित विठ्ठल–८३,केकान प्रतिक्षा महारुद्र–८२,टिकुळे धनंजय रामा–८१,पेशवे आशिष दिलीप–८०,नागवे प्रशांत बिभीषण–७९,माने भक्ती संतोष–७७,मुळे शिवप्रसाद संतोष–७६,राठोड निकिता परमेश्वर–७६, शिंदे ऋषिकेश ज्ञानेश्वर–७५,भांगे पल्वी अनंत–७३,उजगरे आरोही नितीन – ६४, गुण मिळवत उत्तीर्ण झाले आहेत,सर्व उत्तिर्ण विद्यार्थ्यांचे प्रा.डी.के.नागवे सर (संचालक : डी.के.नागवे सर मॅथ्स सायन्स अकॅडमी,वडवणी) व तालुक्यातील शिक्षण प्रेमी नागरीकांच्या वतिन अभिनंदन करुन,पुढील वाटचालीसाठी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या या वेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मा. ॲड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर**

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, "मधुमीन", डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज ॲक्ट 2002 व अब्रिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** दि. 25/02/2026

अर्जदार : श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को-ऑप.क्रैडीट सोसायटी लि. माजलगाव ता. माजलगाव जि. बीड

**विरूद्ध - गैरअर्जदार**

1) ल. अर्ज क्र. 74/2025 1) घुसे लिंगराज रामेश्वरअप्पा 2) कुलकर्णी सत्यविजय रावसाहेब रा. गजानन नगर, माजलगाव ता. माजलगाव जी. बीड 2) लवाद अर्ज क्र. 75/2025 1) घुसे लिंगराज रामेश्वरअप्पा 2) घुसे शिवराज रामेश्वरअप्पा दोघे रा. गजानन नगर, माजलगाव ता. माजलगाव जी. बीड 3) बादाडे अर्जुन दादाराव रा. काडीवडगाव ता. वडवणी जि. बीड 4) सोळंके शरद रामराव रा. सादोळा ता. माजलगाव जि. बीड 5) शेटे नागनाथ रामलिंगअप्पा रा. जिजामाता नगर, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड (**प्रकरणातील अन्य गैरअर्जदार हजर आहेत.**)

(प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीस द्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपना पैकी काहीनी घेऊन गैरहजर राहिलात. काहीनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 11/03/2026 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांसह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / आदेश करण्यात येईल. याची नोद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्यांची दिले आहे.

ॲड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.

**जाहिर प्रगटन**

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३५१ / २०२६**

अर्जदार– **(१) सुनिताबाई भ्र. सोनाजीराव मुळे, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. नेकनुर, ता. जि. बीड. (२) कैलास पि. सोनाजीराव मुळे, वय ३९ वर्षे, धंदा शेती, रा. नेकनूर, ता. जि. बीड. (३) पंडीत पि. सोनाजीराव मुळे, वय ३५ वर्षे, धंदा– शेती, रा. नेकनुर, ता. जि. बीड. (४) महानंदा भ्र. बारिकराव घाडगे, वय ३३ वर्षे, धंदा घरकाम, रा. नेकनुर, ता. जि. बीड.**

गैरअर्जदार : निरंक अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत नामे सोनाजीराव काशीनाथराव मुळे** यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे **सोनाजीराव काशीनाथराव मुळे, रा. नेकनूर, ता. जि. बीड हे दिनांक ०७/१०/२०२१ रोजी नेकनूर, बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयत सोनाजीराव यांची आई संताबाई हया पुर्वीच मयत झालेल्या आहेत. तसेच मयत सोनाजीराव यांचे वडील नामे काशीनाथराव हे पुर्वीच मयत झाले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **पुढील दिनांक ०४/०४/२०२६**

आज दिनांक २७/०२/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**(ॲड. शिंदे एस. बी. यांच्यामार्फत)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत) क. लिपीक**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

दैनिक

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ •

## थोडक्यात...

### येडेश्वरी चैत्र पौर्णिमा यात्रा महोत्सव २०२६ यात्रा नियोजन आढावा बैठक



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य व पर राज्यास परिचित असलेली येरमळयाची येडेश्वरी देवी यात्रा महोत्सव दि.०१ एप्रिल २०२६ ते ०८ एप्रिल २०२६ या दरम्यान येणाऱ्या कालावधीसाठी यात्रा महोत्सव साजरा होणारा असून या यात्रा महोत्सव नियोजन बैठक दि ०६ फेब्रुवारी २०२६ रोजी ठिक सकाळी ११ वाजता ग्रामपंचायत कार्यालय येरमाळा प्रगंणात उपविभागीय अधिकारी कळंब यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत येरमाळा,येडेश्वरी मदिंर संस्थान चे विश्वस्त व संबंधित कार्यालयाचे अधिकारी व ग्रामस्त यांच्या उपस्थितीत येडेश्वरी यात्रा नियोजन करण्यात येणार असल्याचे पत्र कळंब तालुका तहसीलदार मा.हेमंत ढोकळे यांचे पत्र दि.२४ फेब्रुवारी २०२६ च्या अनुषंगाने दि.०६ मार्च रोजी प्राप्ती नुसार बैठक आयोजित करण्यात आली आहे.तर या बैठकीसाठी संबंधित कार्यालयाचे अधिकारी यांनी उपस्थित या बैठकीस उपस्थित राहावे जर गैरहजर राहिल्यास संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल असे ही पत्रात नमूद केले आहे.

### नाळवंडीत आश्रमशाळेत शालेय साहित्याचे वाटप

#### भाजपच्या नगरसेविका डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम



**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या नगरसेविका डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त बीड तालुक्यातील नाळवंडी येथील आश्रमशाळेत शुक्रवारी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी युवा नेते रोहित राऊत, ग्रामपंचायत सदस्य नामदेव म्हेत्रे, सतीश माळोदे, आकाश कानडे, रंगनाथ राऊत, नारायण राऊत, अमोल राऊत, शिक्षक अतुल काळे, खिल्लारे, सारिका होनराव, आरती म्हेत्रे, विद्यागर, देविदास वाघमारे यांच्यासह ग्रामस्थ, विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

### पर्यावरणपूरक शेतीचा आदर्श: शिवाजीराव बादाडे पाटील यांचा 'शेतकरी सन्मान २०२६' पुरस्काराने गौरव



**वडवणी । प्रतिनिधी**

आधुनिक तंत्रज्ञानाचा शास्त्रोक्त अवलंब करून शेती क्षेत्रात क्रांती घडवणाऱ्या प्रगतशील शेतकऱ्यांचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या सोहळ्यात, कडी वडगाव ( ता. वडवणी, जि. बीड) येथील प्रगतशील शेतकरी श्री. शिवाजीराव बादाडे पाटील यांना प्रतिष्ठित 'शेतकरी सन्मान २०२६' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सगुणा रुरल फाऊंडेशन, नेरळ (ता. कर्जत, जि. रायगड) यांच्या वतीने हा सोहळा नुकताच संपन्न झाला. कृषिमित्र ॲग्रो एजन्सी वडवणी चे संचालक श्री. शिवाजी बादाडे पाटील यांनी गेल्या काही काळापासून शून्य मशागत (नशी ढळश्रश्ररसश) या अभिनव तंत्रज्ञानाचा आपल्या शेतीत यशस्वी वापर केला आहे. पारंपरिक शेती पद्धतीला छेद देत, जमिनीची धूप थांबवणे आणि सुपीकता वाढवणे यावर त्यांनी भर दिला. त्यांच्या या प्रयोगामुळे उत्पादनात वाढ तर झालीच, पण त्याचबरोबर शेतीचा खर्चही लक्षणीयरीत्या कमी झाला आहे. या सोहळ्याला सगुणा रुरल फाऊंडेशनचे संस्थापक-संचालक कृषिरत्न चंद्रशेखर भडसावळे, सामाजिक कार्यकर्ते मयंक गांधी, आणि कंट्रोल युनियन इंडियाच्या मॅनेजिंग डायरेक्टर चिन्मयी देऊळगावकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. श्री. शिवाजीराव बादाडे पाटील यांच्या या यशामुळे त्यांच्या गावातील आणि परिसरातील शेतकरी वर्गातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



*भारतीय जनता पार्टी नगरपरिषद गटनेत्या आदरणीय सारिका ताई क्षिरसागर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना अजिंक्य शिराळे.*

### मुंबई उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच बीड येथे स्थापन करण्याच्या मागणीसाठी...

# वकिलांचा जिल्हा कचेरीवर मोर्चा

**● न्याय आपल्या दारी तत्वाचे पालन समान न्यायाने या मागण्यांसह प्राधिकरणे व न्यायालये बीड येथे स्थापन करण्यासाठी वकिल आग्रही**




**बीड । प्रतिनिधी**

न्याय आपल्या दारी या तत्वाचे पालन समान न्यायाने करण्यात यावे बीड शहरात विविध प्राधिकरणे व न्यायालये स्थापन करण्याच्या ११ मागण्यांसाठी बीड जिल्ह्यातील वकील संघाने जिल्हाधिकारी कार्यालयावर न्याय मोर्चा काढण्यात आला. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्य न्यायमुर्ती मुंबई उच्च न्यायालय, मा.पालक न्यायमुर्ती मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मुख्यमंत्री व विधी व न्यायमंत्री महाराष्ट्र राज्य, जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

मुंबई उच्च न्यायालयाचे सर्कीट बेंच बीड येथे स्थापन करण्यात यावे, महसूली बीड जिल्ह्यासाठी बीड येथे नवीन भुसंपादन कायदा २०१३ नुसार भुमीसंपादन पुनर्वसन व पुर्नस्थापना प्राधिकरण बीड येथे स्थापन करावे, महसुली बीड जिल्ह्यासाठी बीड येथे कामगार न्यायालय आणि औद्योगिक न्यायालय बीड येथे स्थापन करावे. महाराष्ट्र महसुली प्राधिकरण स्थापन करण्यात यावे, बीड जिल्ह्यासाठी कर्ज वसूली प्राधिकरण स्थापन करण्यात यावे, महा रेरा प्राधिकरण स्थापन करण्यात यावे, जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अंतर्गत प्रकरणे दिवाणी न्यायालयात वर्ग करण्यात यावे, महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ अंतर्गत होणारी सर्व अपीलाची प्रकरणे जिल्हा न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात देण्यात यावी, महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण बीड येथे स्थापन करण्यात यावे, फौजदारी कायद्याखाली विशेष न्यायालयांची स्वातंत्र जिल्हास्तरावर स्थापन करण्यात यावी अशा ११ मागण्या ह्या भारतीय राज्य घटनेतील न्याय आपल्या दारी या संकल्पनेची पुर्तता होण्यासाठी बीड वकील संघाने वरील मागण्या मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय आणि राज्य व केंद्र सरकार न्यायालय, न्याय आपल्या दारी या योजनेतून तालुका स्तरावर स्थापन करीत आहे. यासह प्रमुख मागणीमध्ये संभाजीनगर (औरंगाबाद) येथील मुंबई उच्च न्यायालयाची बेंच बीड येथे देण्याचीही प्रमुख मागणी आहे. यामुळे उच्च न्यायालयात बीड महसुली मधुन जाणारे अनेक प्रकरणे बीड येथेच निकाली लागतील. अनेकवेळा फिर्यादी हा सततच्या न्यायालयाच्या खेट्या मारल्यामुळे व अधिकचा खर्च होत असल्यामुळे शेवटी माघार घेतो व त्याला न्याय मिळत नाही. बीड येथे नवीन न्यायालयाच्या इमारतीमध्ये अनेक सुविधा उपलब्ध आहेत. नवीन न्यायालय यासाठी बांधण्याची गरज नाही, विविध प्राधिकरण व महसुली न्यायालय बीड येथे स्थापन केल्यास जलद व लोकांना न्याय मिळण्याच्या अपेक्षा वाढतील. बीड जिल्हा वकील संघाने आज आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना दिले आहे.

## प्राचार्य हळदगुणे यांच्या काळात बेशिस्तपणा आय टी आय कॉलेजला प्राचार्य लोंढे शिस्त लावणार का?



**शिरूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील अग्रगण्य संत वामनभाऊ महाराज शासकीय औद्योगिक संस्था (आय टी आय) कॉलेज मध्ये अनेक वर्षापासून बेशिस्त कारभार सुरू आहे. या कार्यालयामध्ये विद्यार्थी च्या शिक्षणावर खूप मोठा परिणाम होत आहे शिक्षक व कर्मचारी मात्र वेळेचा भान न पाहता आओ जाओ घर तुम्हारा अशी अवस्था येथील शासकीय औद्योगिक संस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे हा विशेषतः या अगोदरचे प्राचार्य हळदगुणे यांच्या काळात जास्त प्रमाणात अनेक बाबीत अफरातफर झाली का? हे तपासणे गरजेचे आहे परंतु आता नव्याने आलेले प्राचार्य लोंढे कायमस्वरूपी म्हणून आले होते पण त्यांच्यावरही अतिरिक्त कारभार त्यांच्यावरही प्रभारी म्हणून परळी आष्टीचा कारभार त्यांच्याकडे दिल्याने त्यांचेही नियंत्रण म्हणावे असे दिसत नाही कारण येथील दररोज हजेरी (थंम ) मशीन अनेक वर्षापासून बंद अवस्थेत आहे सध्या कर्मचारी उपस्थित ऑनलाईन असल्याचे सांगत असले तरीही त्या ऑनलाईन मध्ये किती प्रमाणात तथ्य आहे हे सांगता येणे शक्य नाही त्यातच विविध योजना अंतर्गत होत

**शिक्षकांची व कर्मचाऱ्यांची कमतरता**

**या प्रशिक्षण संस्थेमध्ये एकूण आठ कोर्स आहेत कोपा, सुईंग टेक्नॉलॉजी, फिटर ,इलेक्ट्रिशियन, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक ,वेल्डर ,मोटर मेकॅनिक एक व दोन आठ कोर्स असून यासाठी चार शिक्षक या ठिकाणी आहेत मोटर मेकॅनिक हे कोर्स मंजूर असून यासाठी ना शिक्षक ना विद्यार्थी अशी बिकट अवस्था या ठिकाणी आहे**

## पोलीस पाटील भरती प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह ; संबंधित कंपनीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी: ॲड अमोल डोंगरे



**माजलगाव । प्रतिनिधी**

उपविभागीय कार्यालय माजलगाव अंतर्गत होत असलेल्या पोलीस पाटील भरती प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करत बहुजन समाज पार्टीच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. संबंधित प्रकरणात छत्रपती संभाजीनगर येथील एम. टेक मल्टी सर्विसेस या कंपनीवर प्रचलित नियमानुसार गुन्हा दाखल करून काळ्या यादीत टाकण्याची मागणी करण्यात आली आहे.

उपविभाग माजलगाव अंतर्गत रिक्त असलेल्या पोलीस पाटील पदांसाठी २२ फेब्रुवारी २०२६ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली होती. मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. मात्र, शासन निर्णयानुसार ८० गुणांच्या परीक्षेत किमान ३६ गुण (४५ टक्के) आवश्यक असताना त्यापेक्षा कमी गुण मिळवलेल्या उमेदवारांची नावे यादीत समाविष्ट असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. भरती प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. प्रसिद्ध करण्यात आलेली यादी तत्काळ रद्द करून सुधारित व अधिकृत पात्र उमेदवारांची यादी जाहीर करावी, तसेच संबंधित कंपनीवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा उपविभागीय कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. हे निवेदन हेमंत गोरे, अशोक काळे, नामदेव सवासे, पांडुरंग काळे, अविनाश लवटे, रुपाली नागरगोजे यांच्या स्वाक्षरीने देण्यात आले असून, निवेदक म्हणून ॲड. अमोल डोंगरे, जिल्हा प्रभारी, बीड - बहुजन समाज पार्टी यांनी पाठपुरावा केला आहे.

## स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांचे विचार तरुणांनी आत्मसात करावेत भाजपा नेते : नवनाथ अण्णा शिराळे



**बीड येथील जव्हार कॉलनीतील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना पुण्यतिथी निमित्त भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष मा श्री नवनाथ जी अण्णा शिरोळे पाटील यांनी विनम्र अभिवादन केले व सावरकर यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकत उपस्थित सावरकर प्रेमी यांना उत्कृष्ट अनमोल मार्गदर्शन केले .**

**बीड । प्रतिनिधी**

आज बीड विनायक दामोदर सावरकर यांची पुण्यतिथी बीड शहरातील प्रसिद्ध असलेल्या जव्हार कॉलनी या ठिकाणी साजरी करण्यात आली याच अनुषंगाने बीड येथील भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकत उपस्थित सावरकर प्रेमींची मन जिंकले व आपले अभ्यासपूर्वक मनोगत व्यक्त केले पुढे बोलताना अण्णा म्हणाले की स्वतंत्र वीर विनायक दामोदर सावरकर यांनी नाशिक जिल्ह्यातील छोट्याशा भगूर गावी जन्म घेऊन इंडियाच्या इतिहासामध्ये नाव आणण्याचे उल्लेखनीय कार्य आपल्या क्रांतिकारी कार्यातून करून देशासमोर एक आदर्श निर्माण केला त्यांनी २८ वर्ष अंदमान निकोबार या ठिकाणी भारत देशासाठी कारागृहामध्ये काळे पाण्याची शिक्षा भोगली असे विविध भारत देशासाठी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांनी आपल्या हाडाचीकाडकरूनहिंदुत्वतैवतठेवलं


# शिवजयंती व शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांची भव्य मिरवणूक

# गंगनाथवाडी ग्रामस्थांनची डी जे मुक्त आदर्श शिवजयंती

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती व गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांची दोन धाम यात्रा पूर्ण करून आल्याबद्दल गंगनाथवाडी ग्रामस्थानी भव्य दिव्य रथामधून मिरवणूक काढण्यात आली. गंगनाथवाडी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती व गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांची रथा मधून मिरवणूक काढून , डी जे मुक्त आदर्श शिवजयंती साजरी करण्यात आली.







गुरुवार रोजी सायंकाळी ५ वाजता गंगनाथवाडी फाटा ते गंगनाथवाडी अशी मिरवणूक काढण्यात आली संपूर्ण मिरवणूक मार्गात महिलांनी सडा रांगोळी काढण्यात आली होती. गावातील शाळकरी मुले-मुली हलगीच्या तालावर पारंपरिक लेझीम खेळत, डोल ताशा सोबत टाळ विना मृदुंग यांच्या वारकरी भजनी मंडळी अभंगाच्या तालावर ठेका धरत भव्य दिव्य शिवजयंती व शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांची रथा मधून मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत शाळकरी मुलं मुली यांचा विशेष सहभाग होता. गावातील सर्व तरुण मंडळी सोबत महिला मंडळी व गावातील जेष्ठ मंडळी यांनी या मिरवणुकीमध्ये उत्स्फूर्त असा सहभाग नोंदवला. गंगनाथवाडी येथील शिवजयंती समाजाला आदर्श निर्माण करून देणारी ठरली डीजे च्या अवाजवी खर्चाला फाटा देत टाळ, मृदुंग ,विना व पारंपारिक ढोल ताशा यांच्या गजरामध्ये भव्य दिव्य अशी शिवजयंती व गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा यांची मिरवणूक काढून आदर्श समाजासमोर उभा केला